International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Vol. 1 No.4
Mar- Apr 2014

# स्त्री – पुरुष असमानता : समाजशास्त्रीय एक अभ्यास

प्रा. अरुण पौडमल,
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर.

## प्रस्तावना :

स्त्री – पुरुष समानतेचे तत्त्व भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत. मूलभूत हक्कांमध्ये व मार्गदर्शक तत्वांमध्ये समाविष्ट केलेले आहे. राज्यघटनेने स्त्रियांना समानता दिलेली आहे, इतकेच नाही तर घटना स्त्रियांच्या बाजूने सकारात्मक भेदभाव दाखवण्यासाठी सरकारला काही उपाय योजण्यास अधिकार देते. लिंग असमानता अनेक तऱ्हेने व्यक्त होते. पण त्यातील प्रमुख बाब म्हणजे गेली काही दशके लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे पुरुषांशी असलेले प्रमाण सतत कमी होणे हे आहे. सामाजिक साचेबंदपणा व घरामधील मारपीट व सामाजिक हिंसाचार यामधूनही लिंग असमानता दृष्टीस येते. देशाच्या अनेक भागांत मुलगी जन्माला आली म्हणून तिच्याशी दुजाभाव, वयात येणाऱ्या येणाऱ्या मुलींशी किंवा स्त्रियांशी असमान वागणूक असलेली दिसते. लिंग असमानतेची कारणे सामाजिक व आर्थिक संरचनेशी संबंधित असतात. जी औपचारिक व अनौपचारिक प्रमाणकांवर आणि वागण्याच्या पद्धतीवर आधारित असतात.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतांअंतर्गत अभ्यास केला गेला आहे.

## संशोधनाचा उद्देश्य :

प्रस्तावित संशोधनासाठी पुढील उद्देश्य ठरविण्यात आली आहेत.

1) स्त्री – पुरुष असमानतेचा अभ्यास करणे.
2) स्त्री – पुरुष असमानता दूर करण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

## विश्लेषणात्मक निर्वचन :

लोकशाही राजनीतीच्या चौकटीत बसेल अशा प्रकारे आपले कायदे. विकास धोरणे व विकास कार्यक्रमांतून विविध क्षेत्रात स्त्रीयांची प्रगती होईल. म्हणून या बाबीकडे लक्ष दिले आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेनंतर (१९७४–७८) स्त्रियांच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकदम बदलला गेला

आहे. स्त्रियांचे सबलीकरण हा अलीकडच्या काळात स्त्रियांचा दर्जा ठरविण्याचा मुख्य निकष झालेला आहे. स्त्रियांचे कायदेशीर मालकीहक्क व इतर हक्क यांचे संरक्षण करण्याच्या हेतूने स्त्रियांसाठी राष्ट्रीय राष्ट्रीय आयोगाची स्थापना १९९० मध्ये लोकसभेत कायदा पास करून झाली. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने (१९९३) पंचायत व नगरपालिकेत प्रतिनिधी म्हणून स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद झाली. त्यामुळे स्थानिक स्तरावर स्त्रियांनी निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याचा भक्कम पाया घातला गेला. तरीही राज्यघटनेतून, कायद्यातून, धोरणांतून, योजना, कार्यक्रमांतून व इतर यंत्रणांतून जे उद्दिष्ट ठरवलेले होते त्यामध्ये व भारतातील स्त्रियांची सद्य:स्थिती या दोन्ही परिस्थितीत परिस्थितीत खूप अंतर आहे.

स्त्री – पुरुष असमानता दूर करण्यासाठी उपाय :

न्यायिक व कायद्याची पद्धती स्त्रियांकडे जास्त कळकळीने पाहणारी व जास्त जबाबदारीची जाणीव असणारी बनवली जाईल. विशेषतः कुटुंबातून स्त्रीवर होणारे अत्याचार व स्त्रीवर व्यक्तिशः होणारे हल्ले याबाबत जास्त जागृती निर्माण केली जाईल. न्याय लवकर मिळावा व गुन्हेगारांना त्यांच्या गुन्ह्याच्या तीव्रतेप्रमाणे अधिकाधिक कडक शिक्षा मिळावी यासाठी सध्याच्या कायद्यात योग्य योग्य ते बदल केले जातील किंवा नवीन कायदे बनवले जातील.

न्याय पद्धती :

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत वारसा हक्काबद्दल, संपत्तीच्या मालकीबद्दल जे कायदे तयार झाले, त्यामुळे स्त्रियांना नेहमी दुय्यम दर्जा मिळाला. वारसा हक्क व संपत्तीच्या हक्कासंबंधित कायद्यांमध्ये कायद्यांमध्ये सर्व संमतीने बदल करून स्त्रियांना न्याय दिला जाईल.

दारिद्र्य निर्मूलन :

दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येत स्त्रिया बहुसंख्य ने असतात. बऱ्याच वेळा आत्यंतिक दारिद्र्यात स्त्रिया राहतात. घरांमध्ये त्यांच्यावर अन्याय होतो व समाजातही अशा स्त्रियांना भेदभावाची, कमी दर्जाची वागणूक मिळते. अशा स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी निम्नस्तरावर स्थूल आर्थिक धोरणात अशा स्त्रियांच्या अनुषंगातून काही ठराविक विकासाची लक्ष्य ठरवली जातील. गरीब स्त्रियांना एकत्रित करून त्यांना आर्थिक व सामाजिक पर्याय दिले जातील व त्यांची क्षमता वाढवण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य दिले जाईल.

छोटी कर्जे :

उत्पादन करण्यासाठी किंवा स्वत:साठी छोटी कर्जे स्त्रियांना सहज मिळावीत म्हणून सध्याची लहान कर्जे देण्याची यंत्रणा बळकट केली जाईल. नवीन योजना बनवल्या जातील. ज्यामुळे छोटी कर्जे मिळवणे स्त्रियांना सहज शक्य होईल. वित्तीय संस्थांकडून किंवा बँकाकडून दारिद्र्यरेषेखालील स्त्रियांना स्त्रियांना कर्जपुरवठा व्यवस्थित चालू राहील.

स्त्रिया आणि उद्योग :

इलेक्ट्रॉनिक, माहिती-तंत्रज्ञान व अन्नप्रक्रिया, कृषी उद्योग व वस्त्रोद्योग यामध्ये स्त्रियांनी केलेल्या कामा मुळे या क्षेत्राचा चांगला विकास झाला. या उद्योगक्षेत्रात आवश्यक असणारी आधारसेवा, आधारसेवा, सामाजिक सुरक्षितात व कामगार कायदे यामधून या स्त्रियांना मदत केली जाईल.

स्त्री आणि शिक्षण :

स्त्रिया व मुलींना शिक्षणात पुरुषांच्या बरोबरीने प्रवेश मिळण्यासाठी
स्त्रीयांची काळजी घेतली जाईल. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले जाईल. भेदभाव नाहीसा केला जाईल. निरक्षरता दूर केली जाईल. मुली जास्त प्रमाणात शाळेत जातील. शाळा मध्येच सोडून देण्याचे त्यांचे प्रमाण कमी होईल व शिक्षणाचा दर्जा सुधारला जाईल. ज्यामुळे स्त्रियांचा त्यांच्या आयुष्यात फायदा होईल. स्त्रियांनी व्यावसायिक, तांत्रिक कौशल्य मिळवावे यासाठी प्रयत्न केले जातील. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर लिंगभेद कमी करण्यावर खास लक्ष दिले जाईल. सध्याच्या धोरणातील क्षेत्रीय अवधीची ठरवलेली उद्दिष्टे पूर्ण केली जातील. विशेषत: मुली व स्त्रिया विशेषत: अनुसूचित जाती जाती / जनजाती व इतर मागासलेला वर्ग व अल्पसंख्यांक मुलींकडे जास्त लक्ष दिले जाईल. शिक्षणाच्या सर्व स्तरावर स्त्रीवादी अभ्यासक्रम विकसित केला जाईल. लिंगभेदाचे एक कारण लिंग साचेपणा हे असल्याने हे बदल उपयोगी पडतील.

स्त्री आणि आरोग्य :

स्त्रियांच्या आरोग्याकडे पूर्णपणे वेगळ्या दृष्टीने लक्ष दिले जाईल. ज्यामध्ये आरोग्यसेवा व पोषक घटक योग्य प्रमाणात मिळणे या दोन्ही दृष्टीने विचार होईल. मुली व स्त्रिया यांच्या आयुष्याचा विविध वयांमध्ये त्यांना भासणाऱ्या वेगवेगळ्या गरजांकडे खास लक्ष दिले जाईल.

विज्ञान व तंत्रज्ञान :

विज्ञान व तंत्रज्ञानात स्त्रियांना मोठ्या प्रमाणात भाग घ्यावा म्हणून अशा कार्यक्रमांना बळकटी देण्यात येईल. मुलींनी उच्च शिक्षणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हे विषय घ्यावे. वैज्ञानिक व तांत्रिक उद्दिश्ये निविष्टे असलेल्या विकास कार्यक्रमांत स्त्रियांचा मोठा सहभाग मिळेल यासाठी उपाय योजले जातील. विज्ञानदृष्टी व वैज्ञानिक वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांना चालना दिली जाईल. जाईल.

स्त्रियांवरील अन्यायाबद्दल समाजजागृती :

कार्मिक अधिकाऱ्यांचे, न्यायालयातील अधिकारी वर्गाचे व विधानसभा वगैरे ठिकाणच्या अधिकाऱ्यांना स्त्रियांविषयीच्या धोरणांबाबत प्रशिक्षण देणे, धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या व कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या मध्यस्थांना, न्यायाधीश व बिगर सरकारी संघटना यांना धोरणाची योग्य माहिती देण्यासाठी शिक्षण दिले जाईल.

महात्मा गांधी यांच्या मते त्यागाची आणि सेवाभावाची जिवंत प्रतिमा म्हणून मी स्त्रियांची पूजा करीत आलो आहे. निःस्वार्थ सेवाभावाचा जो गुण स्त्री वर्गाला निसर्गतः प्राप्त झालेला आहे, त्यात पुरुष स्त्रियांची कधीच बरोबरी करू शकणार नाहीत. दु:ख पाहताच विरघळणारे करूणामय अंत:करण स्त्री जातीचे असते. स्त्री व पुरुष या दोहोंमध्ये स्त्री जात अधिक थोर आहे. कारण आजदेखील आत्मबलीदानाची मूक सहनशक्तीची, नम्रतेची, श्रद्धेची व ज्ञानाची ती मूर्ती आहे.

२१ व्या शतकातील पहिले वर्ष आपण महिला सबलीकरण वर्ष पाळणार आहोत. ही एक चांगली, अर्थपूर्ण, विकासोन्मुख घटना आहे. भारत देश स्वतंत्र होऊन आता ५४ वर्षे होत आहेत. या अर्धशतकाहून अधिक काळात भारतातील अनेक राज्यात केंद्र शासनाच्या व त्या-त्या राज्यांच्या अनेक महिला विकास योजना राबविल्या गेल्या व आजही राबविल्या जात आहेत. या सर्व विकास कार्यक्रमांत शासकीय पुढाकार हा निश्चितच असतो. पण केवळ शासनाच्या अर्थसाहाय्यामुळे विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी यशस्वी, प्रभावी, परिणामकारक होत नाही तर ज्यांच्या भल्यासाठी या योजना सुरू झाल्या, त्या जनसामान्यांचा स्त्रियांचा व पुरुषांचा सतत, निश्चित सक्रीय सहभाग आवश्यक असतो.

संदर्भ ग्रंथ

१. योजना – ऑगस्ट २००१, माहीती व महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

२. एस. ए. 2010, ऑर्गनायझेशन कल्चर इन वूमेन इममेंट